प्रत्येक कुटुंबाने तीन मुलांना जन्म द्यावा

रा. स्व. संघाचे प्रमुख मोहन भागवत यांचे आवाहन

नवी दिल्ली : भविष्यात कुटुंब व्यवस्था टिकून राहावी आणि देशाची सुरक्षा सुनिश्चित होण्यासाठी प्रत्येक कुटुंबात तीन मुले असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी गुरुवारी केले.

संघाच्या शताब्दी पूर्तीच्या निमित्ताने संघाच्या वतीने देशभरात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याची सुरुवात दिल्लीतील तीन दिवसीय अधिवेशनाने झाली असून यात समाजातील विविध क्षेत्रांतून आलेल्या लोकांशी संघप्रमुख मोहन भागवत संवाद साधत आहेत.

ते म्हणाले की, आम्ही फाळणीला विरोध केला होता. आम्ही अखंड भारताचे समर्थक आहोत आणि आमचा यावर विश्वास आहे. आपणा सर्वांची एकच ओळख आहे. सर्व लोक हिंदू आहेत आणि त्यांची एकच ओळख आहे. ऐक्याची गोष्ट तिथे करावी जिथे काही भेद असतात, असे त्यांनी सांगितले.

गुरुवारी झालेल्या या कार्यक्रमाच्या तिसऱ्या दिवशी त्यांनी अनेक मुद्द्यांवर खुलेपणाने आपली मते व्यक्त केली. अवैध घुसखोरी रोखण्यात आपली भूमिकाही बजावली पाहिजे. सरकार अवैध घुसखोरी थांबवण्यासाठी प्रयत्न करत आहे, पण समाजालाही यात आपली भूमिका पार पाडावी लागेल.

आरक्षण किती दिवस असावे?

यावर मोहन भागवत यांनी खुलेपणाने उत्तर दिले. त्यांनी सांगितले की समाजात एकता यावी यासाठी जर कोणी खड्ड्यात पडला असेल तर त्याला हात देऊन वर ओढले पाहिजे. यामुळेच समाजात ऐक्य प्रस्थापित होईल. आपण हे काम सद्भावनेने करायला हवे.

ते म्हणाले की, "ज्यांना आरक्षणाचा लाभ मिळतो, त्यांना जेव्हा असे वाटेल की आता आम्ही स्वतःच्या बळावर उभे राहू शकतो, तोपर्यंत आम्ही आरक्षणाच्या समर्थनात आहोत." त्यांनी स्पष्ट केले की संविधानात जसे आरक्षणाचे प्रावधान आहे त्यास आम्ही पाठिंबा देतो.

७५ व्या वर्षी निवृत्तीबाबत बोललो नाही

मी कधीही सांगितले नव्हते की, मी कधीही निवृत्त होईन किंवा ७५ व्या वर्षी निवृत्त व्हायला पाहिजे. आम्हाला संघ जे सांगेल ते आम्ही करू असे भागवत म्हणाले.

कोणत्याही वर्गावरील अन्याय दूर केला पाहिजे

मोहन भागवत म्हणाले की धर्मांतर आणि अवैध घुसखोरीमुळेच देशात लोकसंख्येचे असंतुलन झाले आहे. धर्म हा वैयक्तिक पसंतीचा विषय आहे. यात कोणत्याही प्रकारचे प्रलोभन किंवा बलप्रयोग असू नये, असे ते म्हणाले. हिंदू समाजात ऐक्याची गरज आहे आणि त्यासाठी आपल्याला मंदिर, स्मशान आणि विहिरी एकसमान ठेवाव्या लागतील. यावेळी मोहन भागवत यांना आरक्षणाबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले की एखाद्या वर्गावर अन्याय झाला आहे आणि त्यांना प्रतिनिधित्व मिळालेले नाही, तर त्यांना आधार मिळालाच पाहिजे.

संसार वाचवण्याची धडपड

पंजाबमध्ये पुराने हाहाकार माजवला आहे. कपूरथला येथे पुराच्या पाण्यातून आपले सामान होडीतून नेताना नागरिक.

बिहारमध्ये गरीब मतदारांना वगळले

काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा दावा

सीतामढी/मोतिहारी : बिहारच्या मतदार याद्यांतून वगळलेल्या ६५ लाख लोकांमध्ये बहुसंख्य गरीब आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील होते, असा दावा

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुरुवारी केला.

'मतदार अधिकार यात्रा'च्या अंतर्गत सीतामढी येथे सभेला संबोधित करताना गांधी म्हणाले की, बिहारचे लोक भाजप आणि निवडणूक आयोगाला आपला मतदानाचा हक्क "लुटू" देणार नाहीत. आम्ही भाजप आणि निवडणूक आयोगाचा पर्दाफाश केला आहे. ते मतांची चोरी करत होते. महाराष्ट्र, हरियाणा आणि कर्नाटकात त्यांनी हे केले. आता ते बिहारमध्ये हे पुन्हा करायचा प्रयत्न करत आहेत, पण आम्ही त्यांना तसे करू देणार नाही," असे ते म्हणाले.

गांधी यांनी दावा केला की, येत्या काही महिन्यांत ते या कथित "मतांची चोरी"चे आणखी पुरावे देतील.

दिवसाच्या पुढच्या सत्रात हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री

सुखविंदर सिंग सुखू यांनीही मोतिहारी येथे 'मतदार अधिकार यात्रा'त सहभाग घेतला. एक्सवर दिलेल्या पोस्टमध्ये सुखू म्हणाले, "मोतिहारी येथील 'मतदार अधिकार यात्रे'त सहभागी होऊन या महान लोकशाही जनजागृती मोहिमेला आम्ही आणखी गती दिली आहे.

बिहार काँग्रेसच्या कार्यक्रमात नरेंद्र मोदींना शिवीगाळ

राहुल यांनी माफी मागण्याची भाजपची मागणी

पाटणा/नवी दिल्ली : मतचोरी आणि 'एसआयआर'च्या मुद्द्यावरुन काँग्रेस नेते राहुल गांधी आणि राजद नेते तेजस्वी यादव 'मतदार हक्क अधिकार यात्रे'च्या निमित्ताने बिहारचा दौरा करत आहेत. आपल्या भाषणांमधून राहुल गांधी सातत्याने नरेंद्र मोदींवर मतचोरीचा आरोप करत आहेत.

अशातच, दरभंगा येथील काँग्रेसच्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आईच्या नावाने शिवीगाळ करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. राहुल यांच्या नेतृत्वाखालील यात्रेने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत, असे स्पष्ट करून भाजपने याबद्दल राहुल गांधींकडे माफी मागण्याची मागणी केली आहे.

युथ काँग्रेसच्या कार्यक्रमातील एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये राहुल गांधींचे कार्यकर्ते पंतप्रधान मोदींना आईच्या नावाने

शिव्या देताना दिसत आहेत. हा कार्यक्रम युवक काँग्रेसच्या मोहम्मद नौशादने आयोजित केला होता.

उपमुख्यमंत्री विजय सिन्हा म्हणाले की, राहुल गांधींच्या मंचावरुन मोदींना अपशब्द वापरण्यात आला. अशा प्रकारची भाषा सहन करण्यायोग्य नाही. काँग्रेस आणि राजद बिहारमधील वातावरण बिघडवू इच्छितात. मोदींना शिवीगाळ करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. तेजस्वी आणि राहुल यांनी याबद्दल माफी मागावी, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली.

भाजपवर मतचोरीचा आरोप

राहुल गांधींनी सीतामढीमधून मोदींवर पुन्हा मतचोरीचा आरोप केला. जाहीर सभेला संबोधित करताना राहुल गांधी म्हणाले की, आम्हाला माहिती आहे की, भाजपवाले बिहारमधील निवडणुका चोरण्याचा प्रयत्न करत आहेत. हे लोक आधी तुमचे मत घेतील, नंतर तुमचे रेशन कार्ड घेतील आणि नंतर आधारही हिसकावून घेतील, म्हणूनच आम्ही 'मतदार हक्क यात्रा' सुरू केली आहे. निवडणूक आयुक्तांना हे माहित असले पाहिजे की, बिहारमधील लोक हुशार आहेत आणि एकही मत चोरू देणार नाहीत.

चंद्रपूरमध्ये ट्रक व ऑटोरिक्षाचा अपघात

६ जणांचा मृत्यू, २ जखमी

चंद्रपूर: जिल्ह्यातील राजूरा तालुक्यात गुरुवारी ट्रक आणि ऑटोरिक्षाचा भीषण अपघात झाला. यात तीन महिलांसह सहा जणांचा मृत्यू झाला असून दोन जण जखमी झाले आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली.

हा अपघात दुपारी सुमारे चारच्या सुमारास राजुरा-गडचंदूर रोडवरील कपनगावजवळ झाला. सात प्रवासी घेऊन जाणारी ऑटोरिक्षा राजूराहून पाचगावकडे जात असताना समोरून येणाऱ्या ट्रकने तीला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की रिक्षाचा पुढील भाग पूर्णपणे चिरडला गेला, असे राजुरा पोलीस ठाण्यातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि सर्वांना रुग्णालयात दाखल केले. त्यापैकी तिघांचा जागीच मृत्यू झाला होता. तर उर्वरित जखमींपैकी तिघांना चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले, असेही त्यांनी सांगितले.

मृतांमध्ये वर्षा मंडळे (४१), तनु पिंपळकर (१८), ताराबाई पापुलवार (६०), रवींद्र बोबडे (४८), शंकर पिपरे (५०) आणि ऑटोरिक्षा चालक प्रकाश मेश्राम (५०) यांचा समावेश आहे.

दरम्यान, पोलिसांनी ट्रक जप्त केला असून त्याचा चालक फरार आहे. त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले, याप्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

एसआयपी अकॅडमीचा २२ वर्षांचा यशस्वी प्रवास

नाशिक : एसआयपी अकॅडमीने आपला २२ वर्षांचा टप्पा गाठत देशभरात १२५० हून अधिक फ्रँचायझी केंद्रांचा विस्तार साधला आहे. या प्रवासात एसआयपी अॅबॅकस, ग्लोबलआर्ट, मायकिड्स आणि क्रिको इंग्लिश यांसारख्या नाविन्यपूर्ण शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे लाखो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात अकॅडमीला यश आले.

या कार्यक्रमाला देशभरातील फ्रँचायझी प्रतिनिधी, शिक्षक आणि अधिकारी उपस्थित होते.या उत्सवात एसआयपी अकॅडमीचे व्यवस्थापकीय संचालक दिनेश व्हिक्टर यांनी तीन महत्त्वाचे उपक्रम जाहीर केले. त्यांनी सांगितले की, "२२ वर्षांच्या कार्यकाळात अकॅडमीने मुलांच्या बौद्धिक आणि सर्जनशील क्षमतेच्या विकासासाठी उपक्रम राबविले असून, आगामी काळात आणखी व्यापक स्तरावर कार्य करण्याचे उद्दिष्ट आहे."

अखेर मोदी-जिनपिंग भेटीचा मुहूर्त ठरला

रविवारी द्विपक्षीय चर्चा, ट्रम्प 'टॅरिफ'वरही होणार चर्चा

नवी दिल्ली : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत सुरू झालेल्या 'टॅरिफ वॉर'दरम्यान आता पंतप्रधान मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्या भेटीचा मुहूर्त ठरला आहे. तियानजिन येथे रविवारी होणाऱ्या 'शांघाय सहकार्य संघटने'च्या शिखर परिषदेच्या वेळी मोदी-जिनपिंग भेट होणार आहे. 'एससीओ' शिखर परिषदेच्या वेळी म्हणजे ३१ ऑगस्ट रोजी दोन्ही नेते भेटणार असल्याची माहिती समोर आली आहे.

जपानचा दोन दिवसांचा दौरा संपल्यानंतर, मोदी हे जिनपिंग यांच्या निमंत्रणावरून 'एससीओ' शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी चीनमध्ये जाणार आहेत. या द्विपक्षीय चर्चेत ट्रम्प टॅरिफवरही चर्चा होण्याची शक्यता आहे. भारतातील चीनचे राजदूत झू फेहोंग म्हणाले की, एससीओ शिखर परिषदेसाठी मोदींचा तियानजिन दौरा दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये सुधारणा आणि विकासाला एक नवीन चालना देईल. ही भेट यशस्वी करणे खूप महत्वाचे आहे, आम्ही या भेटीला खूप महत्त्व देतो.

वास्तविक नियंत्रण रेषेवर दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये झालेल्या गलवान खोऱ्यातील संघर्षानंतरचा हा पहिलाच दौरा असणार आहे. २०२४ मध्ये रशियातील कझान येथे झालेल्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या वेळी दोन्ही नेत्यांची बैठक झाली होती. भारत आणि चीनमध्ये चार वर्षांपासून सुरू असलेला सीमा संघर्ष संपविण्यासाठी 'एलएसी'वर गस्त घालण्याचा करार द्विपक्षीय चर्चेत करण्यात आला.

तीन दहशतवादी नेपाळमार्गे बिहारमध्ये शिरल्याचा संशय

पोलिसांकडून संशयितांची रेखाचित्रे जारी

पाटणा : पाकिस्तानातील दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदचे तीन दहशतवादी नेपाळमार्गे बिहारमध्ये घुसल्याची माहिती गुप्तचर यंत्रणांना मिळाल्याने बिहार पोलिस मुख्यालयाने राज्यात हाय अलर्ट जारी केला आहे. या दहशतवाद्यांची ओळख पटली असून त्यांची नावे हसनैन अली (रावळपिंडी), आदिल हुसेन (उमरकोट) आणि मोहम्मद उस्मान (बहावलपूर) अशी आहेत. पोलिसांनी या दहशतवाद्यांची रेखाचित्रेही जारी केली आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, रावळपिंडीमधील हसनैन अली, उमरकोट येथील आदिल हुसेन आणि बहावलपूर येथील मोहम्मद उस्मान अशी या तीन दहशतवाद्यांची नावे आहेत.

ते ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात काठमांडूला पोहोचले होते आणि गेल्या आठवड्यात त्यांनी बिहारमध्ये प्रवेश केला. त्यामुळे नेपाळ सीमेला लागून असलेल्या भागातील सीसीटीव्ही कॅमेरे स्कॅन केले जात आहेत.

सुरक्षा यंत्रणांना गस्त वाढविण्याचे आणि गुप्त सूचना गोळा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्याच्या गुप्तचर विभागांना प्रत्येक संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवले जात आहे.

गस्त वाढविली

बिहारमध्ये 'ऑपरेशन सिंदूर'नंतर आणि आगामी विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम लक्षात घेता भारत-नेपाळ सीमाभाग आणि सीमांचल जिल्ह्यांत सुरक्षा वाढविण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. मधुबनी, सीतामढी, सुपौल, अररिया, पूर्व आणि पश्चिम चंपारण जिल्ह्यांसह सीमावर्ती भागात गस्त वाढविण्यात आली आहे. बिहार आणि नेपाळ यांच्यात ७२९ किमींची विस्तीर्ण अशी सीमा आहे. घुसखोरी आणि सीमेपलीकडून होणाऱ्या हालचालींसाठी बिहार हे एक प्रमुख केंद्र बनले आहे. राज्यातील सात जिल्हे खुल्या सीमेवर वसलेले आहेत. त्यामुळे या भागात सतत देखरेख आणि सुरक्षा पुरविण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर असते.

यंत्रणा सक्रिय

बिहारमधील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस आणि सुरक्षा यंत्रणा सतर्क आहेत. कोणत्याही संशयास्पद व्यक्ती किंवा हालचालींबद्दल तत्काळ पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन पोलीस मुख्यालयाने सर्वसामान्यांना केले आहे. गुप्त माहिती गोळा करण्यासाठी आणि संशयित दहशतवाद्यांवर योग्य कारवाई करण्यासाठी पोलीस मुख्यालयाने सर्व जिल्ह्यांची गुप्तचर यंत्रणा सक्रिय केली आहे.

रशियाचा युक्रेनवर ड्रोन, क्षेपणास्त्र हल्ला; १२ ठार, ४८ जखमी

कीव्ह: युक्रेनची राजधानी कीवमध्ये गुरुवारी पहाटे रशियाने केलेल्या मोठ्या प्रमाणावरील ड्रोन व क्षेपणास्त्र हल्ल्यात किमान १२ जण ठार झाले तर ४८ जखमी झाले. शहराच्या मध्यवर्ती भागावरही दुर्मिळ असा हल्ला झाला असल्याचे स्थानिक अधिकाऱ्यांनी सांगितले.

गेल्या काही आठवड्यांनंतर कीव्हवर झालेला हा पहिला मोठा संयुक्त हल्ला आहे. युक्रेनच्या हवाई दलाच्या माहितीनुसार, रशियाने ५९८ हल्लेखोर ड्रोन व डमी ड्रोन तसेच विविध प्रकारची ३१ क्षेपणास्त्रे देशभरात डागली.

रशिया चर्चेच्या टेबलाऐवजी बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची निवड करत आहे," असे युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी हल्ल्यानंतर एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले. "जगभरातील शांततेची हाक देणाऱ्यांकडून आता ठोस भूमिकेपेक्षा मौनच जास्त दिसते. आम्ही प्रतिसादाची अपेक्षा करतो."

दरम्यान, रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की त्यांनी रात्री १०२ युक्रेनियन ड्रोन पाडले.

मुंबई, कोहिमा महिलांसाठी सुरक्षित शहरे

'नारी २०२५' अहवालातील माहिती

नवी दिल्ली : मुंबई, कोहिमा, आयझॉल, गंगटोक, ईटानगर आदी शहरे महिलांसाठी अधिक सुरक्षित आहेत. तर देशातील शहरी भागातील ४० टक्के महिला आपल्या शहरात "फारशा सुरक्षित नाही" किंवा "असुरक्षित" असल्याचे जाणवते. रात्रीच्या वेळी अपुरी प्रकाशयोजना आणि दृश्यमान सुरक्षेचा अभाव यामुळे महिलांच्या चिंता अधिक वाढतात, असे धक्कादायक निष्कर्ष 'नारी २०२५' अहवालात काढले आहेत.

महिलांच्या सुरक्षेबाबतचा राष्ट्रीय वार्षिक अहवाल आणि निर्देशांक "नारी २०२५" मध्ये भारतातील सुरक्षेची चिंताजनक स्थिती उघड झाली आहे.

या अभ्यासात देशातील सर्व राज्यांतील ३१ शहरांमधील १२७७० महिलांचे अनुभव

समाविष्ट केले आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी डेटा-आधारित आराखडा दिला आहे. निष्कर्षांनुसार रांची, श्रीनगर, कोलकाता, दिल्ली, फरीदाबाद, पाटणा आणि जयपूर ही देशातील महिलांसाठी सर्वाधिक असुरक्षित शहरे ठरली आहेत, तर कोहिमा, विशाखापट्टणम, भुवनेश्वर, आयझॉल, गंगटोक, ईटानगर आणि मुंबई ही महिलांसाठी सुरक्षित शहरांमध्ये गणली गेली आहेत.

रस्त्यावर अधिक त्रास

भारतामध्ये मोठ्या प्रमाणात महिलांना रस्त्यावर त्रासाला सामोरे जावे लागते. यामध्ये एकटक पाहणे, शिट्ट्या मारणे, अश्लील टिप्पणी करणे, शारीरिक स्पर्श यांचा समावेश आहे. यामुळे अनेक विद्यार्थिनींना शिक्षण सोडावे लागले किंवा नोकरदार महिलांना नोकरी सोडावी लागली.

२०२४ मध्ये सात टक्के महिलांनी त्रासाला सामोरे गेल्याचे सांगितले, ज्यामध्ये १८ ते २४ वयोगटातील तरुण महिलांना सर्वाधिक धोका होता. याउलट राष्ट्रीय गुन्हे नोंद २०२२ च्या आकडेवारीत महिलांविरुद्ध गुन्ह्यांचे प्रमाण फक्त ०.०७ टक्के दाखवले आहे. अपुरी पायाभूत सुविधा, निकृष्ट प्रकाशयोजना आणि अप्रभावी सार्वजनिक वाहतूक यामुळे महिलांना सार्वजनिक ठिकाणे असुरक्षित वाटतात. यावर समाजातील बळीला दोष देण्याची मानसिकता अधिक भर घालते.

'नारी २०२५' अहवाल हे केवळ अधिकृत राष्ट्रीय गुन्हे नोंदणीच्या आकडेवारीपेक्षा पुढे जाऊन महिलांच्या दैनंदिन अनुभवांना समोर आणतो. अनेक महिला सामाजिक कलंक किंवा अधिक त्रासाच्या भीतीने तक्रार करत नाहीत. फक्त २२ टक्के महिलांनी आपला अनुभव अधिकाऱ्यांना सांगितला, आणि त्यापैकी फक्त १६ टक्के प्रकरणांमध्येच कारवाई झाली.

जाहीर नोटीस

सर्व बोनाफाईड रहिवाशांसह संबंधित व्यक्ती, पर्यावरण गट, स्वयंसेवी संस्था आणि इतरांना याद्वारे सुचित केले जाते की, राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण, महाराष्ट्र यांनी मे. पॅराडाईज सुपरस्ट्रक्चर्स (कार्यालयाचा पत्ताः १७०१, १७ वा माळा, सतरा प्लाझा, प्लॉट नं. १९ आणि २०, सेक्टर नं. १९डी, वाशी, नवी मुंबई ४००७०५.) यांच्या वसाहत/व्यावसायिक बांधकामासाठी में. पॅराडाईज सुपरस्ट्रक्चर्स, प्रकल्पाचा पत्ताः सर्वे नं. ९३/२+४ व इतर गाव रोहिंजण, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६., यास पर्यावरण मंजुरी दिली आहे. **परिशिष्ट**

ईसी पत्र क्र. SIA/MH/INFRA2/470804/2024, दि. २२/०८/२०२५ मंजुरी पत्राची प्रत परिवेश पोर्टलवर उपलब्ध आहे आणि ती पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या https://parivesh.nic.in/ या संकेतस्थळावरही पाहता येईल.

दिनांकः २९/०८/२०२५
ठिकाणः नवी मुंबई

SBI भारतीय स्टेट बैंक State Bank of India

होम लोन सेंटर सायन,
बी ६०२ /६०४, कोहिनूर सिटी, कमर्शियल-१, एल.बी.एस. लगत, कुर्ला (पश्चिम), मुंबई-४०००७०.

(नियम ८(१) पहा) कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरिता)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे स्टेट बँक ऑफ इंडिया चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि कलम १३(१२) सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ सहवाचता नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **०६/०५/२०२५** रोजी **मागणी सूचना** जारी करून कर्जदार **श्री. वैभव भरत नांदे आणि सौ. वंदना भरत नांदे (गृह कर्ज खाते क्र. ४१७९५९८११९५)** यांस सूचनेतील एकूण नमूद रकम **रु. ७८,८९,५३४/- (रुपये अठ्ठ्याहत्तर लाख एकोणनव्वद हजार पाचशे चौतीस मात्र)** त्यासह **०६.०५.२०२५** पासून पुढील व्याज या रकमेची परतफेड रोजीस अधिक व्याजदर मासिक आधारावर आणि देयकाच्या तारखेपर्यंत देय असलेल्या इतर शुल्कांवर ची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.

रकमेची परतफेड करण्यास कर्जदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार/हमीदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा **कब्जा** सदर ॲक्टच्या कलम १३(४) अंतर्गत सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ आणि ९ अन्वये **२५ ऑगस्ट २०२५** रोजी घेतला आहे.

विशेषत: कर्जदार/हमीदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा स्टेट बँक ऑफ इंडियास, **रु. ७८,८९,५३४/-** आणि त्यावरील व्याज आणि इतर खर्च.

तारण मत्तेच्या विमोचनासाठी उपलब्ध वेळेत सदर ॲक्टच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदी अन्वये कर्जदार चे लक्ष वेधले जाते.

स्थावर मिळकतीचे वर्णन :

फ्लॅट क्र.६०३, मोजमापित सुमारे ५७.५० चौ.मी. चटई ६वा मजला वर अरिहंत हाइट्स अशा ज्ञात बिल्डिंग येथील गाव किरोल, तालुका कुर्ला, म्युनिसिपल स्कुल मागे, पारशीवाडी, घाटकोपर पश्चिम, मुंबई-४०००८६.

दिनांक : - २५/०८/२०२५ **प्राधिकृत अधिकारी,**
ठिकाण : - मुंबई **स्टेट बँक ऑफ इंडिया**

बॉम्बे जिमखाना लिमिटेड
कॉर्पोरेट आयडेन्टिफिकेशन नंबर (सीआयएन) : यु७४९९९एमएच१९२२पीएलसी०००९७३
नोंदणीकृत कार्यालय : महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई - ४००००१
दूरध्वनी क्र. : +९१-२२ २२०७ ०३११-१२/+९१-२२ ४३२२३४००
वेबसाईट : http://www.bombaygymkhana.com
ईमेल : compliance.officer@bombaygymkhana.com

सूचना

याद्वारे सूचना देण्यांत येते की, बॉम्बे जिमखाना लिमिटेड (''जिमखाना'') च्या सभासदांची १५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') गुरूवार, २५ सप्टेंबर, २०२५ रोजी सं. ५.०० वा. महात्मा गांधी रोड, मुंबई - ४००००१ येथील बॉम्बे जिमखाना जागेत १३ ऑगस्ट, २०२५ दिनांकित एजीएमच्या सूचनेत तपशिलवार दिलेल्या कामकाज करण्यासाठी होईल. जिमखान्याने २५ ऑगस्ट, २०२४ रोजी एजीएमच्या सूनेसह वार्षिक अहवाल पाठवणे पूर्ण केले आहे. एजीएमच्या सूचनेतील कामकाजाच्या बाबी (i) सोमवार, २२ सप्टेंबर, २०२५ रोजी स. ९.०० वा. (भाप्रवे) सुरू होऊन बुधवार, २४ सप्टेंबर, २०२५ रोजी सं. ५.०० वा. (भाप्रवे) संपणाऱ्या रिमोट ई-व्होटींग सुविधा किंवा (ii) गुरुवार, २५ सप्टेंबर, २०२५ रोजी सं. ५.१५ वा. ते सं. ९.०० वा., शुक्रवार, २६ सप्टेंबर, २०२५ रोजी स. ९.०० वा. ते स. ८.०० वा. आणि शनिवार, २७ सप्टेंबर, २०२५ रोजी स. ९.०० वा. ते रा. ७.०० वा. एजीएम येथे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रत्यक्ष मतदानाद्वारे करता येतील.

जिमखान्याच्या मॅनेजिंग कमिटीने सुरळीत आणि पारदर्शक पध्दतीने मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी एक तपासणी अधिकारी नियुक्त केला आहे.

मॅनेजिंग कमिटीच्या आदेशावरून
सीएमडीई के. एन. भगत
मुख्य कार्यकारी अधिकारी
मुंबई : ह्या २८ ऑगस्ट, २०२५ दिनांकीत **बॉम्बे जिमखाना लिमिटेड**

-: ऑनलाईन सोडन पध्दतीने सदनिका वाटपाची नोटीस :-

भांडुप वक्रतुंड एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सी.टी.एस.नं. ४५४, जुन्या बँक ऑफ बडौदा जवळ, जे.एम.रोड, भांडुप (प), मुंबई - ४०० ०७८ या नोंदणीकृत संस्थेच्या पुनर्वसन इमारतीमधील निवासी सदनिकांचे सोडत पध्दतीने वितरण करण्यासाठी प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. १६२ नुसार मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, (पूर्व व पश्चिम उपनगरे), झोपुप्रा, बृहन्मुंबई यांचेकडील दि. २५/०७/२०२५ रोजीचे पत्रान्वये माझी प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर पुनर्वसन इमारतीमधील निवासी सदनिकांचे सोडत ऑनलाईन पध्दतीने वितरण **दि. ०२/०९/२०२५ रोजी, सकाळी १२.०० वाजता, स्थळ : प्राधिकरणाच्या कार्यालयात ऑनलाईन पध्दतीने झुम ॲप (Zoom App)** वर आयोजित केलेली आहे.

: सभेचा विषय :

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील परिपत्रक क्र. १६२/दि. २३/१०/२०१५ व ऑनलाईन झुम ॲप (Zoom App) वर सोडन पध्दतीने योजनेतील इमारतीमधील एकूण ४४ निवसी सदनिकांचे वाटप करणे.

झुम ॲप वरील लिंक : https://us04web.zoom.us/j/87416050872
Meeting ID : 87416050872
Passcode : 123456

(सुनिल नरवाडे)
ठिकाण : मुंबई. **प्राधिकृत अधिकारी तथा**
दिनांक : २२/०८/२०२५. **सहकारी अधिकारी श्रेणी २, झोपूप्रा, बृहन्मुंबई**